# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.**
**दूरध्वाीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.**
ई-मेलः www.mercindia@mercindia.org.in **वेबसाइट** www.mercindia.org.in


## जाहीर सूचना

**'स्थानिक वीज निर्मितीवर आधारित विद्युत वितरणासाठी फ्रँचायसी ' दृष्टिकोन पत्रिकेवरील सूचना व अभिप्राय मागविण्यासाठी**

महाराष्ट्र राज्याला विजेच्या तीव्र टंचाईला तोंड द्यावे लागत असून अनेक भागांना दीर्घ काळ व मोठ्या प्रमाणात तीव्र वीज टंचाईला सामोरे जावे लागत आहे. विजेची मागणी व पुरवठ्यातील सतत वाढणा-या तफावतीमुळे, राज्यातील विद्युत कंपन्यांपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे. महाराष्ट्रात सध्याच्या पारेषण यंत्रणेवर अधिक भार न टाकता विजेचे उत्पादन स्थानिकरित्या वाढविणे फार महत्त्वाचे असल्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

२. या संदर्भात, आयोगाने मेसर्स एबीपीएस इन्फ्रास्ट्रक्चर एडव्हायझरी यांची " स्थानिक वीज निर्मितीवर आधारित विद्युत वितरणासाठी फ्रँचायसी" यावर एक दृष्टिकोन पत्रिका तयार करण्यासाठी नेमणूक केली आहे. विजेच्या मागणी व पुरवठ्यातील वाढती तफावत कमी करण्यासाठी आणि विद्युत वितरण अधिक खात्रीदायक व कार्यक्षम करण्यासाठी हा एक पर्याय आहे.

३. वितरण परवानाधारकाने करावयाची फ्रँचायसीची नियुक्ति, आयोगाने मंजूर केलेल्या वीज दराप्रमाणे विशिष्ट क्षेत्रामध्ये ग्राहकांना विजेचे वितरण, विजेची मागणी व पुरवठ्यातील तूट भरुन काढण्यासाठी विजेची निर्मिती,

यांचा विचार या दृष्टिकोन पत्रिकेमध्ये करण्यात आला आहे. या फ्रँचायसी योजनेमध्ये, ग्रीडशी जोडलेली कमी-कालावधीत पारंपरिक अथवा अ-पारंपरिक स्रोतांद्वारे वीज निर्मिती क्षमता स्थापित करणे अभिप्रेत आहे. यामुळे अधिक वीज निर्मिती क्षमता उपलब्ध होणार असून भार केंद्राच्या जवळ स्थानिकरित्या फ्रँचायसी वीज निर्मिती करणार असल्याने तांत्रिक हानि देखील कमी होणार आहे. सध्याचा विजेचा तीव्र तुटवडा लक्षात घेता, फ्रँचायसीला स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती क्षमतेस पूरक म्हणून राज्याबाहेरून विजेची खरेदी करावी लागणार आहे. परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेची सर्व तांत्रिक आणि वाणिज्यिक कार्ये फ्रँचायसीला करावी लागणार आहेत. वितरण कार्याच्या कार्यक्षमतेत सुधारणा व्हावी याकरिता खाजगी क्षेत्र, स्थानिक संस्था व औद्योगिक संघटनांच्या सहभागास प्रस्तावित संकल्पना चालना देते.

४ या दृष्टिकोन पत्रिकेमध्ये फ्रँचायसी कराराची चौकट आणि परवानाधारक व फ्रँचायसी यांची भूमिका आणि तसेच वितरण व्यवस्थापन आणि वीज निर्मिती याबाबतचे चर्चेचे विषय मांडण्यात आले आहेत. कार्यकारी गोषवारा (मराठी व इंग्रजीत) आणि सविस्तर दृष्टिकोन पत्रिका (इंग्रजीत) आयोगाच्या **www.mercindia.org.in** या वेबसाइटवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहेत.

५. या दृष्टिकोन पत्रिकेवरील सूचना/अभिप्राय आयोगाच्या सचिवांना प्रतिज्ञापत्राद्वारे दिनांक ३० मार्च, २००७ रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रितीने पाठवावेत व त्यामध्ये पाठविणा-याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता, पिन-कोड क्रमांक व, असल्यास, इ-मेल नमूद केलेला असावा.

सही/-
(श्रीमती मालिनी शंकर)
सचिव, मविनिआ

मुंबई.
दिनांकः ८ मार्च, २००७